# विद्यार्थ्यांना कंपन्यांच्या दारापर्यंत पोहोचविणारी संस्था : सीएसएमएसएस

## उत्कृष्ट निकालाची परंपरा : अभियांत्रिकी कॉलेजमध्ये कंपन्यांची गरज ओळखून घडवितात विद्यार्थी



डॉ. उल्हास शिंदे
प्राचार्य

### तांत्रिक कौशल्य आणि उद्योजकता विकास विभाग

### अनुभवी प्राचार्य आणि प्राध्यापक




### माझा विद्यार्थी, माझी जबाबदारी

— शब्दांकन : गणेश खेडकर

औरंगाबाद TODAY

## शाहू अभियांत्रिकीत उद्या परिसर मुलाखती

दिव्य मराठी

सिटी स्कॅन | औरंगाबाद, शनिवार, ११ जुलै २०१५ | ८

## आज, उद्या जॉब फेअर

पदवी, बीएड, पदवी, पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी आयोजन



## शाहू अभियांत्रिकीत जॉब फेअरला प्रारंभ

पुण्यनगरी

औरंगाबाद वृत्तवेध

# शाहू अभियांत्रिकीतील 'जॉब फेअर २०१५'ला प्रतिसाद

औरंगाबाद/प्रतिनिधी

सी.एस.एम.एस.एस.चे छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय व एम्पायर आयटी पार्क यांच्या संयुक्त विद्यमाने ११ व १२ जुलै रोजी सकाळी सी.एस.एम.एस.एस.चे छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय, कांचनवाडी येथे 'जॉब फेअर २०१५' ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. औरंगाबाद विभागातील पात्र उमेदवारांना नामांकित इंडस्ट्रीत रोजगाराची संधी एका छताखाली मिळावी हा आहे. या अंतर्गत मॅकबीज, वसावंत इंजिनिअरिंग, केटन इंडिया, वडवे इंजिनिअरिंग, व्हिडीओकॉन, विप्रो, कोरआयटी, टीमलिज, पुणे, टाटा इंडिकॉम, व्होडाफोन आदी नावाजलेल्या उद्योगांच्या प्रतिनिधींनी पात्र उमेदवारांच्या परिसर मुलाखती घेतल्या. पॉलिटेक्निक, अभियांत्रिकी, एमबीए, आयटी.आय, नर्सिंग, डी.एड., बी.एड., बी.एस्सी., बी.कॉम., दहावी, बारावी या शैक्षणिक पात्रता असणाऱ्या पात्रताधारकांनी याचा फायदा घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमास संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, पॉलिटेक्निकचे प्राचार्य गणेश डोंगरे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष रणजित मुळे, सचिव पद्माकर मुळे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र टाईम्स दि. 17/06/2015



# 'सीएसएमएस'मध्ये कॅम्पस इंटरव्ह्यू

LIBRARY

पुण्यनगरी

# परिसर मुलाखतीत १४४ विद्यार्थ्यांना नोकरी

औरंगाबाद/प्रतिनिधी

सामना

बुधवार, दि. २१ ऑगस्ट २०१६



कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांसह सोनी लोणारी, अंकित पटेल, अर्पित तोलानी, रूपेश पटेल, अजित मोटे, प्राचार्य यू.बी. शिंदे, एस.पी. अभंग आदी.

# छत्रपती शाहू महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्ह्यू

संभाजीनगर, दि. ३० (प्रतिनिधी)- कोकणवाडी येथील छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयात नुकतेच रेड हॅट इंडिया या आंतरराष्ट्रीय कंपनीतर्फे कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रेड हॅटतर्फे एच.आर. मॅनेजर सोनी लोणारी, अंकित पटेल, अर्पित तोलानी, रूपेश पटेल, अजित मोटे यांनी मुलाखती घेतल्या. यावेळी ॲप्टिट्यूड टेस्ट, टेलिफोनिक मुलाखती प्रत्यक्ष मुलाखती झाल्या. सात-पाच विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड करण्यात आली. यावेळी प्राचार्य यू. बी. शिंदे, संगणक विभागप्रमुख डॉ. एस.पी. अभंग, प्रा. बी.आर. चौधरी, प्रा. एस.डी. काशीद, ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट अधिकारी एस.बी. कुलकर्णी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

**CSMSS Chh. Shahu College of Engineering, Aurangabad. DTE CODE- 2533**

August 16 at 4:29pm

Good Article By Prof. Vaidya on Electronics Engineering

### "इलेक्ट्रॉनिक्स चे बदलते जग"

[illegible]

# छत्रपती शाहू अभियांत्रिकीमध्ये रेड हॅट इंडियाचे इंटरव्ह्यू

[illegible]



LIBRARY

दै. दिव्यमराठी दि. 26.07.2016

# विद्यार्थ्यांना कंपन्यांच्या दारापर्यंत पोहोचविणारी संस्था :

## उत्कृष्ट निकालाची परंपरा : अभियांत्रिकी कॉलेजमध्ये कंपन्यांची गरज ओळखून घडवितात विद्यार्थी

तांत्रिक शिक्षणासाठी दारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना खुली व्हावीत आणि तळागाळातल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळावी, हा उदात्त हेतू मनात ठेवून छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष [illegible] मुळे, सचिव [illegible] मुळे यांनी अभियांत्रिकी कॉलेजची सुरुवात केली. डेंटल, आयुर्वेद, कृषी आणि पॉलिटेक्निकमध्ये अग्रेसर असलेल्या सीएसएमएसएस संस्थेच्या इंजिनिअरिंग कॉलेजनेही अल्पावधीत औरंगाबादच्या शैक्षणिक क्षेत्रात आपला ठसा उमटविला. [illegible] विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष कामाचा थेट अनुभव दिला जातो. [illegible] औद्योगिक [illegible] विद्यार्थ्यांना कंपन्यांची गरज ओळखून घडविण्यासाठी ते नेहमी आग्रही असतात. त्यामुळे टेक्नोक्रॅटअंतर्गत कॉलेजमध्ये सर्व सुविधा देऊन विद्यार्थ्यांना थेट कंपनीतही दिले जाते. अनुभवी प्राध्यापकांच्या अथक मेहनतीमुळे या संस्थेतील विद्यार्थी हा केवळ कागदाची डिग्री घेऊन जात नाही तर त्याला कंपनीच्या दारापर्यंत पोहोचविण्याचे काम छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था करते, असे अभियांत्रिकी कॉलेजचे प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे यांनी सांगितले.

चांगले शिकणारा विद्यार्थी घडविण्यासाठी औरंगाबादेत सर्वांत पुढे असलेल्या या संस्थेविषयी प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे म्हणाले, टीसीएसच्या ऑफ कॅम्पस ड्राइव्ह घेणारी सीएसएमएसएस ही मराठवाड्यातील पहिली संस्था ठरली आहे. २० एकरच्या निसर्गरम्य परिसरात वसलेल्या छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे नाव प्रमुख शैक्षणिक संस्थांमध्ये अग्रभागी घेतले जाते.


डॉ. उल्हास शिंदे
प्राचार्य

जिम्नॅशियम, स्मार्ट फॅसिलिटी, २४ तास हॉस्पिटल, बस, कँटिन, हॉस्टेल, एटीएम, मैदान, गॅदरिंग, हायस्पीड इंटरनेट या भौतिक सुविधा देण्यात शैक्षणिक संस्थांमध्ये या संस्थेचा औरंगाबादमध्ये कोणीही हात धरू शकत नाही. जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा देणाऱ्या या संस्थेने शिक्षणाच्या बाबतीतही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या प्रत्येक अडचणींना समजून घेऊन येथील प्राध्यापक विद्यार्थी घडविण्याचे काम करीत असतात.

सीएसएमएसएसच्या अभियांत्रिकी कॉलेजचे पहिले वैशिष्ट्य म्हणजे येथे औद्योगिक क्षेत्राच्या मागणीप्रमाणे विद्यार्थ्यांना तयार केले जाते. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याची अॅप्टिट्यूड टेस्ट (अभियोग्यता चाचणी) घेतली जाते. तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण असणाऱ्या तज्ज्ञांचे लेक्चर ठेवले जातात. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा, विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास व्हावा म्हणून प्रशिक्षण दिले जाते. कंपन्यांच्या भेटी घडवून आणल्या जातात. या सगळ्यांचा परिणाम म्हणजे कॉलेजच्या स्थापनेपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम आहे. पहिल्या वर्षाच्या बॅचचा निकाल [illegible] टक्के असतो. निकाल चांगला यावा आणि विद्यार्थ्यांवर वैयक्तिक लक्ष देता यावे म्हणून वर्गात मोजक्याच विद्यार्थ्यांचा समावेश असतो. कॉलेज महाविद्यालयाचे ग्रंथालय २४ तास विद्यार्थ्यांसाठी खुले असते. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी दररोज एक विषय शिक्षक महाविद्यालयाच्या वेळेव्यतिरिक्त येथे उपस्थित असतात.

### तांत्रिक कौशल्य आणि उद्योजकता विकास विभाग

ईडीआय अहमदाबाद, डीएसटी भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याशी संलग्न असलेले सीएसएमएसएस हे कॉलेज तांत्रिक कौशल्य आणि उद्योजकता विकास विभागामार्फत विविध कार्यक्रम राबवून १०० टक्के नोकरीची हमी देते. आतापर्यंत अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन आणि विज्ञान शाखेतील पदवीधर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन नोकऱ्या मिळवून दिल्याचे प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे यांनी सांगितले. व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम घेऊन विद्यार्थ्यांना विदेशी भाषांचेही शिक्षण येथे दिले जाते. विद्यार्थी हा स्वतःहून उद्योजक बनला पाहिजे यासाठी कॉलेज सतत प्रयत्न करीत असते. येथे आयआयटी मुंबईचे रिमोट सेंटर आहे. ४० पेक्षा जास्त कंपन्यांनी ऑफ कॅम्पस ड्राइव्हसाठी महाविद्यालयाला भेट दिली. आयजीटीआर, टेक्न, [illegible] तांत्रिक प्रशिक्षणही येथे दिले जाते.

### अनुभवी प्राचार्य आणि प्राध्यापक

इलेक्ट्रॉनिक अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, सदस्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या फॅकल्टी ऑफ इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजी विभागाचे पाच वर्षे डीन असलेले डॉ. उल्हास शिंदे हे इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य आहेत. त्यांच्या या दांडग्या अनुभवाचा फायदा येथील विद्यार्थ्यांना होत असून औद्योगिक क्षेत्रातही डॉ. शिंदे यांची मजबूत पकड आहे. त्यांच्या या अनुभवाच्या जोरावर ते प्राध्यापकांना योग्य मार्गदर्शन करून विद्यार्थी घडविण्यात मदत करतात. २० विद्यार्थ्यांच्या पाठीमागे एक शिक्षक ठेवून ते विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर करतात. यामुळे जागेवर विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविल्या जातात. एकही लेक्चर किंवा प्रॅक्टिकल वाया जाऊ नये म्हणून अतिरिक्त स्टाफ नियुक्त केलेला आहे.

### माझा विद्यार्थी, माझी जबाबदारी

सीएसएमएसएसच्या अभियांत्रिकी कॉलेजमध्ये 'माझा विद्यार्थी, माझी जबाबदारी' हा अनोखा उपक्रम राबविला जातो. विद्यार्थी कसा आहे?, त्याची जबाबदारी काय आहे? या मुद्द्यावर शिक्षक सतत काम करतात. पाहुनच भविष्यात विद्यार्थ्याने नेमके काय करावे? याचेही मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांना 'रोबोटिक्स'चे ट्रेनिंग देण्यात येते. तसेच गरजू विद्यार्थ्यांसाठी 'कमवा आणि शिका' ही योजना राबविली जाते. या योजनेमुळे संस्थेबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात आदर निर्माण होतो.

— शब्दांकन : गणेश खेडकर

औरंगाबाद दिव्यमराठी - औरंगाबाद, शनिवार 30 मे, 2015

# छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय

1986 साली शैक्षणिक क्षेत्रात पाऊल ठेवणाऱ्या छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या निसर्गरम्य परिसरात, 2013 साली सुरू झालेल्या छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाने पदार्पणातच देदीप्यमान काम करून कमी काळातच विद्यार्थी वर्गामध्ये आपले महत्त्वाचे स्थान निश्चित केले आहे. मराठवाड्यातील अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन त्यांना व्यावसायिक जगामध्ये पाऊल ठेवण्याच्या हेतूने सक्षम करण्यास हे महाविद्यालय कटिबद्ध आहे. संस्थेचे सचिव श्री. पद्माकरराव मुळे यांनी या भागातील विद्यार्थ्यांना जागतिक पातळीच्या शैक्षणिक सुविधा पुरवण्याचा वसा घेतला आहे. त्यांच्या प्रयत्नास साद देत हे महाविद्यालय मराठवाड्यात किंवा महाराष्ट्रातच नव्हे तर जागतिक पातळीवर चांगली कामगिरी करून, उत्तुंग भरारी घेण्यास सज्ज आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे हे विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विद्याशाखेचे अधिष्ठाता असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्राध्यापकांची उत्कृष्ट फळी तयार झाली आहे, जी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दिवसरात्र झटत आहे. या महाविद्यालयाची सुरुवात अभियांत्रिकीच्या महत्त्वाच्या चार शाखांच्या अभ्यासक्रमाने झाली. मेकॅनिकल (यंत्र अभियांत्रिकी) कॉम्प्युटर सायन्स (संगणक अभियांत्रिकी), इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन (अणुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी) आणि इलेक्ट्रीकल (विद्युत अभियांत्रिकी) अभियांत्रिकी. या शैक्षणिक वर्षापासून सिव्हिल (स्थापत्य अभियांत्रिकी) ही शाखा सुरू करण्यात आली आहे. महाविद्यालयाची काही प्रमुख वैशिष्ट्ये : वर्गातील मुलांची कमी संख्या, कॉलेजमध्येच शिकवणीसारखे वर्ग, पालकांना वेळोवेळी प्रगतिपत्रक इ. साधारणतः प्रथम वर्षाचे वर्ग हे साठ ते ऐंशी विद्यार्थी संख्येचे आढळतात. पण या महाविद्यालयामध्ये वर्ग चाळीस विद्यार्थी संख्येचे आहेत, ज्यामुळे शिक्षकांना प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे शक्य होते. तसेच दर 20 मुलांमागे एक प्राध्यापक पालक म्हणून नेमलेला असतो, जो त्या 20 मुलांच्या शैक्षणिक, वैयक्तिक, आरोग्यविषयक बाबींची काळजी घेतो, जेणेकरून त्या मुलांनाही आपली अडचण सांगण्यासाठी हक्काची व्यक्ती उपलब्ध होते. गणितासारख्या विषयांचे विद्यापीठाने नमूद केलेल्या तासांपेक्षा जास्त तास घेऊन विद्यार्थ्यांचे गणित पक्के करण्यावर महाविद्यालयात भर दिला जातो. यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिकवणीकडे पाठ फिरवली आहे. याशिवाय पालकांना दर महिन्याला विद्यार्थ्यांचे प्रगतिपत्रक पाठविण्यात येते, ज्यात पाल्याची उपस्थिती व चाचण्यांचे गुण पाठविले जातात. याद्वारे सर्व पालकांशी संबंध जोपासला जातो त्याचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी फायदा होतो. महाविद्यालयाने पहिल्या वर्षातच आयआयटी, मुंबईच्या स्पोकन ट्युटोरियलचे केंद्र मिळविले आहे. तसेच इन्फोसिसच्या कॅम्पस कनेक्टचे सदस्यत्वसुद्धा मिळविले आहे. गतवर्षी या महाविद्यालयास तैवानच्या यू-चेंग विद्यापीठाने भेट देऊन येथील विद्यार्थ्यांना त्यांच्या विद्यापीठात पुढील शिक्षणास प्रवेश देण्यास अनुकूलता दर्शविली आहे. महाविद्यालयातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून पारितोषिक मिळवत महाविद्यालयाची मान उंचावली आहे. स्त्री शिक्षणाला महत्त्व देऊन या संस्थेने ग्रामीण भागातील मुलींसाठी उत्कृष्ट वसतिगृहाची व्यवस्था केलेली आहे. तसेच संस्थेच्या परिसरातच अद्ययावत रुग्णालयसुद्धा उपलब्ध करून दिले आहे. संस्थेच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी व्यायामशाळा व विविध खेळांसाठी क्रीडांगण व क्रीडासामग्री उपलब्ध आहे. महाविद्यालय सुरुवातीपासूनच एन.बी.ए. तसेच आय.एस.ओ. मानांकनासाठी प्रयत्नशील आहे.

– प्राचार्य छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद

लोकमत दि. 24-06-2016

## छत्रपती शाहू इंजिनिअरिंग कॉलेजचे यश

दिव्य मराठी

सिटी कव्हर

## जॉब फेअरचे उद्घाटन

महाराष्ट्र टाइम्स

दि. 23.06.2016

## शाहू कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे यश

**औरंगाबाद :** छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचालित छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगमधील मेकॅनिकल, कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन, इलेक्ट्रिकल, सिव्हिल इंजिनीअरिंगच्या प्रथम वर्षात शिक्षण घेणारे ८९ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या आजवरच्या वाटचालीतील हा निकाल अभिमानास्पद असल्याचे संस्थेचे सचिव पद्माकरराव मुळे यांनी सांगितले. महाविद्यालयाची सुरुवात वर्ष २०१३ मध्ये झाली असून संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. एस. जी. देशमुख आहेत. कौशल्य विकासावर भर देताना आम्ही त्यांच्या विकासाला चालना देण्याचे कार्य करतो, असे कॉलेजचे प्राचार्य डॉ. यु. बी. शिंदे यांनी नमूद केले. यावेळी संस्थेचे एचआर ए. बी. अहेर, विभागप्रमुख अमित रावते आदींची उपस्थिती होती.

# उद्योगांना स्वस्त वीज देणार

## लाइटिंग अँड सोलार रूफ टॉप परिषदेत ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे उद्योजकांना आश्वासन



लोकमत औरंगाबाद, गुरुवार, दि. १ सप्टेंबर २०१६ ८



सत्कार... सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा मराठवाड्यातील उद्योजकांतर्फे बुधवारी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित राम भोगले, एन.के. गुप्ता, अरविंद माछर, गौतम नंदावत, हेमंत कपाडिया, रितेश शर्मा, डी.बी.सोनी, मुकुंद कुलकर्णी, आ. अतुल सावे, प्रभृती.

# उद्योगांना छत्तीसगडपेक्षा स्वस्त वीज लवकरच

## ऊर्जामंत्र्यांची ग्वाही : शेतकऱ्यांनाही आता १२ तास पुरवठा

औरंगाबाद : आगामी काळात उद्योगांना छत्तीसगडपेक्षाही कमी दराने वीजपुरवठा केला जाईल, तसेच शेतकऱ्यांनाही ८ ऐवजी १२ तास वीजपुरवठा केला जाईल, अशी घोषणा राज्याचे ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी येथे केली.

### जिनिंग, सूतगिरण्यांना २.६० दराने वीज

जिनिंग प्रेसिंग, सूतगिरण्या हे कापसावर आधारित उद्योग असून, त्यांना औद्योगिक दराने वीजपुरवठा करणे सुचवले आहे. या उद्योगांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी आता २.६० रुपये प्रतियुनिट या दराने वीजपुरवठा केला जाईल, अशी घोषणाही बावनकुळे यांनी केली.

### चार हजार कृषी फिडरवर सौरऊर्जेचे पॅनल

### उद्योगांनो, 'महावितरण'कडे परत या

दिव्य मराठी – दि. – १०.०६.२०१६

# छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये कार्यशाळा

औरंगाबाद : छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील अणुविद्युत, दूरसंचार अभियांत्रिकी विभाग आणि आयटीई औरंगाबाद सेंटरच्या संयुक्त विद्यमाने सहादिवसीय 'मॅटलॅब आणि सिम्युलिंक' कार्यशाळेला ६ जूनपासून सुरुवात झाली आहे. ११ जूनपर्यंत चालणाऱ्या या कार्यशाळेचे उद्घाटन प्रशासकीय अधिकारी डॉ. एस.जी. देशमुख, ज्ञानगंगा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅण्ड रिसर्च, (झील) पुणे येथील डॉ. जी.एम. मालवतकर व आयटीईचे डॉ. सचिन देशमुख, प्राचार्य जी.बी. डोंगरे यांच्या हस्ते करण्यात आले. यात डॉ. एस.एन. तलवार, डॉ. एम.बी. कोकरे, डॉ. के.एम. बकवाड, डॉ. जी.एम. मालवतकर आदींचे मार्गदर्शन लाभणार आहे. प्राचार्य डॉ. उल्हास बी. शिंदे यांनीही मार्गदर्शन केले. प्रा. एम.जी. नाकरानी, प्रा. एस.आर. झंवर, प्रा. ना.सु. वैद्य, प्रा. ए.ड. देशमुख, प्रा. एस.एस. अली, प्रा. के.एम. बिरादार, प्रा. के.एस. आगे, प्रा. व्ही.आर. वैरागडे, प्रा. डी.एस. देशमुख आदी प्राध्यापकांनी ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील कार्यशाळेतील व्यासपीठावर मान्यवर.

शुक्रवार, १ जुलै २०१६



*छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या कॉलेजमध्ये कार्यशाळेप्रसंगी उपस्थित प्राध्यापक आणि विद्यार्थी.*

## शाहू कॉलेजमध्ये मॅटलॅब, सिम्युलिंक कार्यशाळा

छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग शाखेमधील अणुविद्युत आणि दूरसंचार अभियांत्रिकी विभाग आणि आयटीईसेंटरच्या वतीने ६ दिवसीय मॅटलॅब आणि सिम्युलिंक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत इंजिनीअरिंग कॉलेजमधील प्राध्यापक व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी उपस्थिती होती. कार्यशाळेच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव पद्माकर मुळे, अध्यक्ष रणजित मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. एस. जी. देशमुख यांनी अभिनंदन केले. कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी प्रा. एम. जी. नाकरानी, प्रा. एस. आर. झंवर, प्रा. ना. सु. वैद्य, प्रा. ए. डी. देशमुख, प्रा. एस. एस. अली, प्रा. के. एम. बिरादार, प्रा. के. एस. आगे, प्रा. व्ही. आर. वैरागडे, प्रा. डी. एस. देशमुख आदींनी परिश्रम घेतले.

दिव्यमराठी दि. [illegible]

# ४५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा विभागीय परिषदेत सहभाग

## छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजन



विद्यार्थी परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी रुपाली नागरे, स्मृती दागर, श्रीकांत देशमुख, वाय.ए.कवडे, जे.डब्ल्यू.बकाल, रत्नदीप देशमुख, उल्हास शिंदे, गणेश डोंगरे.

औरंगाबाद • डीबी स्टार

छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय आणि आयईटीईतर्फे आयोजित पहिल्या पश्चिम विभागीय विद्यार्थी परिषदेत राज्यातून विज्ञान, अभियांत्रिकी आणि पॉलिटेक्निकच्या ४५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

परिषदेचे उद्घाटन आयईटीईच्या चेअरमन स्मृती दागर, समन्वयक जे. डब्ल्यू.बकाल, डॉ. वाय.ए. कवडे, डॉ. आर. आर. देशमुख, शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या ट्रस्टी रुपाली नागरे-पाटील, प्रशासकीय अधिकारी श्रीकांत देशमुख, प्राचार्य उल्हास शिंदे, प्राचार्य गणेश डोंगरे यांच्या उपस्थितीत झाले. प्रा. महेश मेटी यांनी प्रास्ताविक केले. अॅप्टिट्यूड टेस्ट, टेक्नो क्रॅकर, प्रोजेक्ट कॉम्पिटेशन स्पर्धा घेण्यात आल्या. स्मृती दागर यांनी सांगितले की, तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. विद्यार्थ्यांनी हा बदल लक्षात घेऊन अपडेट व्हावे आणि स्पर्धेला सामोरे जावे. रुपाली नागरे म्हणाल्या की, शाहू शिक्षण संस्थेने कृषी, आयुर्वेदिक, दंत, तंत्रनिकेतन आणि अभियांत्रिकी क्षेत्रात दर्जेदार काम केले आहे. संस्थेचे सेक्रेटरी पद्माकर मुळे, अध्यक्ष रणजित मुळे यांच्या प्रयत्नाने संस्था नावारूपाला आली. रत्नदीप देशमुख म्हणाले की, काळाच्या गरजेनुसार विद्यार्थ्यांनी बदल करायला हवा. डॉ. वाय.ए.कवडे म्हणाले की, भारतात तरुणांची संख्या जास्त आहे. त्यामुळे उद्योगात झोकून तरुणांनी नवे रोजगार उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करावे. डॉ. बकाल म्हणाले की, महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, गुजरात, गोवा, कर्नाटक ही राज्ये पश्चिम विभागात मोडत असून २०० पेक्षा महाविद्यालये आयईटीईचे स्टुडंटस फोरम आहेत.

# सामना

संभाजीनगर



*विद्यार्थी परिषदेचे उद्घाटन करताना रूपाली विश्वास नागरे पाटील, स्मृती दागर, डॉ. श्रीकांत देशमुख, डॉ. वाय. ए. कवडे, डॉ. जे. डब्ल्यू. बकाल, डॉ. रत्नदीप देशमुख, प्राचार्य उल्हास शिंदे आदी.*

# शाहू अभियांत्रिकीत विद्यार्थी परिषद

संभाजीनगर, दि. १६ (प्रतिनिधी) – छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय आणि आय.ई.टी.ई यांनी आयोजित केलेल्या पहिल्या पश्चिम विभागीय विद्यार्थी परिषदेस राज्यातून विज्ञान अभियांत्रिकी आणि पॉलिटेक्निकच्या ४५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

परिषदेचे उद्घाटन आयईटीईच्या अध्यक्षा स्मृती दागर, डॉ. जे. डब्ल्यू. बकाल, डॉ. वाय. ए. कवडे, डॉ. आर. आर. देशमुख, डॉ. सचिन देशमुख, डॉ. नम्रता रुपाली नागरे, डॉ. श्रीकांत देशमुख, प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, प्रा. गणेश डोंगरे यांच्या हस्ते करण्यात आले.

दिवसभर अॅप्टीट्यूड टेस्ट, टेक्नो क्रॅकर आणि प्रोजेक्ट कॉम्पीटीशन या स्पर्धा घेण्यात आल्या त्यामध्ये ८९८ स्पर्धकांनी सहभाग घेतला.

टेक्नो क्रॅकर प्रथम पारितोषिक गणेश कपले, द्वितीय साईमा अन्सारी, तृतीय आकांक्षा गरड, उत्तेजनार्थ पुष्पलता कांहजे, अॅप्टीट्यूड टेस्टचे प्रथम पारितोषिक विवेक फापळ, द्वितीय खाजेकर स्मिता थॉमस, तृतीय बीपीन काळे, उत्तेजनार्थ मंगेश गिरी, प्रोजेक्ट कॉम्पीटीशनचे प्रथम पारितोषिक मयूर गुजाळ आणि ग्रुप अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय संगमनेर यांच्या डिझाईन अँड मॅन्युफॅक्चरींग ऑफ रिक्षा ऑन सोलर एनर्जी या प्रोजेक्टला मिळाले.

यावेळी प्रा. महेंद्र मेटी, प्रा. देवेंद्र भुयार, प्रा. संजय कुलकर्णी, प्रा. प्रशांत जाधव, प्रा. सादिक पटेल, प्रा. महेश तेलंक, प्रा. केतन काळे, प्रा. विनोद बेराळे, प्रा. सी. एम. राव, प्रा. कृष्णा आगे, प्रा. भोपळे, रवी देशमुख, तन्मय जैस्वाल, समीर पटेल, गायत्री जहागीरदार, दिपीका, किशोर दातखळे, श्रेया, मंगेश साहूर, रवींद्र लवांदे, सचिन तायडे, सोमेश्वर राठोड, अनिल घाडगे, सागर राठोड, महेश काकडे, तुलजा जिंदे, डॉ. रत्नदीप देशमुख, डॉ. सचिन देशमुख, डॉ. नम्रता, अमोल विभुते, महेश लाहरा, स्वप्नील धापमारे आदींची उपस्थिती होती.

SHAHU COLLEGE OF ENGG.
LIBRARY
A'BAD.

दै. गावकरी दि. २९.०७.२०१६

## ई-यंत्रा रोबोटिक्स प्रयोगशाळेचे उद्घाटन

औरंगाबाद / प्रतिनिधी

छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित, छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयात ई-यंत्रा रोबोटिक्स प्रयोगशाळेचे उद्घाटन ऑनलाईन व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आय आय टी मुंबई येथे ई यंत्रा प्रोजेक्टचे प्रमुख डॉ. कवी आर्या आणि डॉ व्हिडिओ कृष्णा लाला यांच्या उपस्थित संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख आणि प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या ऑनलाईन उद्घाटन सोहळ्याचे प्रक्षेपण देशभरातून ई यंत्रा सदस्य असलेल्या या इतर महाविद्यालयांमध्ये करण्यात आले.

महाविद्यालयात स्थापन केलेल्या ई-यंत्रा रोबोटिक्स प्रयोगशाळेच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख यांनी विद्यार्थी व शिक्षकांना संबोधताना सांगितले की, औरंगाबाद हे नजीकच्या भविष्यात इलेक्ट्रॉनिक्स हब म्हणून उदयास येत आहे तसेच डी. एम. आयसीमुळे विद्यार्थ्यांना रोबोटिक्स आणि ऑटोमेशन या क्षेत्रात नोकरीच्या संधी चालून येतील भविष्याची आणि काळाची गरज ओळखून संस्था आधुनिक तंत्रज्ञान व सुविधा पुरविण्यासाठी बांधील आहे. विद्यार्थ्यांना या अद्ययावत तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळणे गरजेचे आहे. त्यासाठी प्राध्यापकांनी सुद्धा नवीन तंत्रज्ञान अवगत करून जास्त भर प्रयोगाभिमुख शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करावे.

या प्रसंगी प्रा. डॉ. उल्हास शिंदे यांनी सांगितले की आय आय टी मुंबईच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील सात प्राध्यापकांनी ऑनलाईन प्रशिक्षण पूर्ण केले व टास्क बेस्ड ट्रेनिंग करत असताना १८० पैकी १७९ गुण ए ग्रेड तसेच रोख पारितोषिकासह प्रमाणपत्र मिळवलेले आहे. हे प्रशिक्षित प्राध्यापक मेंटर फॉर टेक्निकल स्कील या विभागातर्फे ई-यंत्रा रोबोटिक्स प्रयोगशाळेत प्रशिक्षण देतील. या प्रशिक्षणाचा फायदा विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट तयार करण्यात तसेच विविध स्तरावरील रोबोटिक्स स्पर्धांमध्ये होईल. काळाची गरज ओळखून विद्यार्थ्यांनी स्कील इंडिया व मेक इन इंडियामध्ये सहभागी होणे गरजेचे आहे. महाविद्यालयाला या गोष्टीची जाणीव असून ई-यंत्र आणि स्पोकन ट्युटोरियल या प्रोजेक्टसाठी महाविद्यालयाला आय. आय. टी. मुंबईचे रीजनल सेंटरचा दर्जा मिळवण्यात यश आले आहे.

दैनिक **दिव्य मराठी**

दिव्य सिटी | **सिटी ॲक्टिव्हिटी** | औरंगाबाद, मंगळवार, १ मार्च २०१६ | २

**market watch**



कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे यांच्यासह उपस्थित मान्यवर.

## ई-यंत्रा रोबोटिक्स कार्यशाळा संपन्न

औरंगाबाद- छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या (सीएसएमएसएस) छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय, कांचनवाडी येथे दोन दिवसीय ई-यंत्रा रोबोटिक्स कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. आयआयटी मुंबईच्या सहयोग व मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेत मराठवाडा विभागासह विदर्भातील बडनेरा, अमरावतीसह १९ महाविद्यालयातील एकूण ७३ प्राध्यापकांनी सहभाग घेतला. कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, आयआयटी मुंबईचे प्रकल्प अभियंता पुष्कराज, अक्षय जैन, सचिन गुप्ता यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे सचिव पद्माकर मुळे, डॉ. श्रीकांत देशमुख, प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे यांच्यासह सर्व विभागप्रमुखांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रा. महेंद्र शेटी, धनंजय नर्मला, सचिन लहाने, विनोद वैराणडे, सर्व प्राध्यापक, कर्मचारी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# स्टरलाईट प्रकल्प 'डीएमआयसी'त आणण्याचा प्रयत्न

## ■ ब्रह्मोद्योग संमेलनात उद्योगमंत्री सुभाष देसाईंची माहिती



औरंगाबाद/प्रतिनिधी

...गाबाद इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचे ...दन करण्याचे राज्य सरकारने ...विले आहे. त्यासाठी औरंगाबाद ...मध्ये डीएमआयसीमध्ये स्वतंत्र ...क्ट्रॉनिक्स झोन उभारण्याचा सरकारने ...य घेतला आहे. या झोनमध्ये ...रलाईटचा प्रकल्प आणण्यासाठी ...राज्य सरकार प्रयत्नशील असून हा ...प डीएमआयसीमध्येच सुरू व्हावा ...ठी बोलणी सुरू असल्याची माहिती ...चे उद्योग मंत्री सुभाष देसाई यांनी ...

...ड बायपास मार्गावरील गुरू लॉन्स ...शनिवारपासून आयोजित अखिल ...य ब्रह्मोद्योग संमेलनात ते बोलत होते. याप्रसंगी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष गोविंद कुलकर्णी, भिवळे उद्योग समूहाचे ... शिवसेनेचे नेते, खासदार चंद्रकांत खैरे, बडवे उद्योग समूहाचे श्रीकांत बडवे, आमदार संजय शिरसाट, आमदार अतुल सावे, शिवसेना जिल्हा प्रमुख अंबादास दानवे, ब्राह्मण महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष अनिल मुळे, रेणुकादास वैद्य यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

देसाई म्हणाले, डीएमआयसी अंतर्गत शेंद्रा, बिडकीनमध्ये इलेक्ट्रॉनिक्स उद्योगांना लागणाऱ्या पायाभूत सुविधा देण्याचे काम सुरू आहे. देशातील इलेक्ट्रॉनिक्स झोनमध्ये मोठे उद्योग यावेत अशी सरकारची भूमिका आहे. भारतीय लोक इलेक्ट्रॉनिक्सच्या वस्तूंचा वापर मोठ्या प्रमाणात करतात. त्यामुळे देशाला या वस्तूंची मोठ्याप्रमाणावर आयात करावी लागते. सरकारने देशांतर्गत इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचे उत्पादन वाढवण्याचे ठरवले असून त्यामुळे या वस्तूंच्या आयातीत घट होईल. ते म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्रीच ब्राह्मण आहेत, त्यामुळे ब्रह्मोद्योगाने कोणताही आडपडदा न ठेवता त्यांच्याकडे आपल्या मागण्या मांडाव्यात. ब्रह्मोद्योगाप्रमाणेच प्रत्येक समाजाने उद्योग वाढीसाठी प्रयत्न केल्यास महाराष्ट्र उद्योगाच्याबाबतीत तेजःपुंज होण्यास वेळ लागणार नाही, अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

याप्रसंगी मान्यवरांचा शाल, स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष गोविंद कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात ब्राह्मण महासंघ स्थापन करण्याची मागणी केली. खासदार खैरे यांचेही भाषण झाले. संमेलन आणि प्रदर्शनासाठी महाराष्ट्राशिवाय शेजारील राज्यातून ब्राह्मण उद्योजक उपस्थित होते.

# औरंगाबादेतील इलेक्ट्रॉनिक्स प्रकल्पाला विशेष सवलत

**नाशिक, ठाणे, नागपूरलाही फायदा : टेलिकॉम मंत्री प्रसाद**

**नवी दिल्ली** | देशातील इलेक्ट्रॉनिक्स बाजाराला चालना मिळण्यासाठी सर्व सुविधा देण्यात येतील, असे केंद्रीय दूरसंचारमंत्री रविशंकर प्रसाद यांनी मंगळवारी सांगितले. औरंगाबाद, नाशिक, नागपूर, ठाणे, गाझियाबाद, वडोदरा, अहमदाबाद, गांधीनगर येथे इलेक्ट्रॉनिक्स चिप निर्मिती प्रकल्प टाकल्यास त्यांना स्वस्तात सोयी तसेच खास अनुदान देण्यात येईल, असेही प्रसाद यांनी स्पष्ट केले. प्रसाद म्हणाले, येत्या २०२० पर्यंत देशातील इलेक्ट्रॉनिक्स बाजारपेठ ४०० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. या पैकी ३०० अब्ज डॉलर आयातीच्या स्वरूपात येणार आहेत. यामुळे स्थानिक पातळीवर इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने निर्मितीला किती वाव आहे, हे स्पष्ट होते. सरकारने फेब्रुवारीमध्ये इलेक्ट्रॉनिक्स चिप निर्मिती करणाऱ्या दोन प्रकल्पांना हिरवा कंदील दाखवला आहे. यामुळे ६३,४१२ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे.



# ‘डीएमआयसी’त इलेक्ट्रॉनिक झोन

## ब्रह्मोद्योग संमेलनात उद्योगमंत्री सुभाष देसाई यांची घोषणा

- बंद उद्योग सक्षम करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन
- देशभरातील साडेसातशे उद्योजकांचा सहभाग

तीन टप्प्यांत केंद्र सरकारचा उपक्रम; हजारो रोजगार निर्माण होण्याचा तज्ज्ञांचा अंदाज

# औरंगाबादेत उभारणार इलेक्ट्रॉनिक्स हब

प्रतिनिधी | औरंगाबाद

प्रगत राष्ट्रांनी इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात भरारी घेतली आहे. भारताचा विकास मात्र या क्षेत्रात अपेक्षित वेगाने झालेला नाही. त्यामुळे केंद्र सरकारने 'नॅशनल इलेक्ट्रॉनिक्स पॉलिसी-२०१२' ची मोहीम हाती घेतली आहे. त्याअंतर्गत २०२० पर्यंत इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात उत्तुंग कामगिरीचे लक्ष्य आहे. त्याचाच एक भाग म्हणून औरंगाबादेत 'इलेक्ट्रॉनिक्स हब' उभारले जाणार आहे.

केंद्रीय माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव जे. सत्यनारायण यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांच्या नियंत्रणातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (निलिट) आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्यामध्ये नुकताच सामंजस्य करार झाला आहे. बी.टेक. (इलेक्ट्रॉनिक्स सिस्टिम अँड मॅन्युफॅक्चरिंग) व एम.टेक. (इलेक्ट्रॉनिक्स डिझाइन टेक्नॉलॉजी) हे दोन अभ्यासक्रम आगामी शैक्षणिक सत्रापासून सुरू करण्याची तरतूद करारात आहे. पण त्याहीपुढे जाऊन २०२० पर्यंत 'इलेक्ट्रॉनिक्स हब' उभारण्याच्या दृष्टीने हे पाऊल टाकले आहे. तीन टप्प्यांत हे हब उभारले जाईल. त्यासाठी कुशल आणि अकुशल मनुष्यबळाची निर्मिती व्हावी म्हणून देशभरात अडीच हजार पीएचडीचे संशोधन करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे.



### असे असतील तीन टप्पे

- एज्युकेशन, लर्निंग आणि ट्रेनिंग प्रक्रियेद्वारे कुशल मनुष्यबळ तयार करण्यात येणार आहे.
- रिसर्च अँड डेव्हलपमेंट कार्यक्रमांतर्गत पीएचडीधारक विद्यार्थी तयार केले जातील.
- सिस्टिम डिझाइन अँड प्रोजेक्टद्वारे प्रत्यक्ष प्रकल्प उभारण्याचे काम सुरू होईल.

### यांना होईल फायदा

विद्यार्थी, शिक्षक, संशोधक, उद्योजक आणि व्यावसायिक, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान उद्योग, शासनाच्या स्वायत्त संस्था, विद्यापीठ-शासकीय संस्था, सेवाभावी संस्था, डिफेन्स, पॉलिटेक्निक आणि व्यावसायिकेतर अन्य घटकांना या धोरणाचा फायदा होणार आहे.

### इलेक्ट्रॉनिक्स धोरणाचे उद्देश असे

- संशोधन, वैज्ञानिक समस्या सोडविण्यासाठी विकास साधणे
- माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात अनुकूल विकास घडवून आणणे.
- हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर डिझाइनचे डिझाइन करणे
- पोर्टेबल डिव्हाइस आणि सायबर ॲक्टिव्हिटीशी संबंधित नियंत्रण मिळवणे.
- शिक्षण, प्रशिक्षण आणि ऊर्जा विकास.
- सायबर क्राइम मल्टिमोड्यूल बायोमेट्रिक डाटाबेस आणि डाटा मायनिंगसाठी नवे तंत्रज्ञान विकसित करणे आदींसह इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात देशाने अग्रेसर व्हावे यासाठी सर्व प्रयत्न करणे.

### विद्यापीठाचाही प्रस्ताव

सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर कम्युनिटी इन्फॉर्मेटिक्स अँड सायबर सिक्युरिटी स्टडीज या स्वतंत्र केंद्रासाठी विद्यापीठाने केंद्र सरकारकडे एक सविस्तर प्रस्ताव सादर केला आहे. इलेक्ट्रॉनिक्स हबच्या विकासाच्या राष्ट्रीय धोरणाला साकारण्यासाठी हा प्रस्ताव मंजूर होण्याची शक्यता आहे.

### ७५ टक्के अनुदान

पहिल्या टप्प्यानंतर तरुणांना या क्षेत्रात उद्योग उभारण्यासाठी खर्चाच्या ७५ टक्के अनुदान दिले जाईल. उद्योजकांना फक्त २५ टक्के गुंतवणूक करावी लागेल. अमेरिकेने या धोरणासाठी ४.७ ट्रिलियन डॉलरची तरतूद केली आहे, तर भारताने ४०० बिलियन डॉलरचे उद्दिष्ट ठरवले आहे.

### पुढे काय?

औरंगाबादेत इलेक्ट्रॉनिक्स हब झाले तर संलग्नपणे संबंधित नवसंशोधन होऊन उद्योग उभे राहणार आहेत. त्यात हजारो तरुणांना रोजगार मिळण्याची शक्यता आहे. पहिल्या तीन वर्षांत आउटपुट मिळण्यास सुरुवात होईल. शैक्षणिक संस्था फक्त पेटंट, ब्रेनमार्कचे काम करतील. केंद्र सरकारने ही सर्व कामे लक्षात घेतली असून आगामी सत्रात विद्यार्थी घडवण्याचे काम होईल, अशी आशा संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान विभागाचे विभागप्रमुख डॉ. के. व्ही. काळे यांनी व्यक्त केली.

# हॅलो औरंगाबाद

लोकमत

सुभाष देसाई : स्टरलाईटच्या प्रकल्पासाठी प्रयत्न

## 'डीएमआयसी'त इलेक्ट्रॉनिक्स झोन

'आयटीडीसी' तर्फे रेल्वेस्टेशनची पाहणी

Exclusive Dealer of Air Conditioner

BLUE STAR

LAIMAR AIR TECHNOLOGY

मोबाईल : 8007 99 55 99

INDIANA'S RED VELVET VEG RESTAURANT

Continental • Italian Oriental • Indian

A.c Restaurant

A.c Banquet Hall

# अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या नावांमधील गोंधळ दूर होणार

रेश्मा शिवडेकर, मुंबई

## २३९ पदव्या आणि ३९९ पदविका

## अभ्यासक्रम एक, नाव अनेक

सोमवार, १३ जून २०१६



# देशाच्या उन्नतीसाठी तंत्रशिक्षण उत्तम पर्याय

## शाहू महाराज शिक्षण संस्थेचे सचिव पद्माकर मुळे यांचे प्रतिपादन

संभाजीनगर, दि. १२ (प्रतिनिधी) - आपला कल लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी योग्य अभ्यासक्रमाची अचुक निवड केल्यास आणि समाज आणि देशाचा विचार करुन प्रचंड मेहनत करीत शिक्षण पूर्ण केल्यास स्वत:ची, समाजाची पर्यायाने देशाची उन्नती झाल्याशिवाय राहणार नाही. तंत्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थी देशाला जागतिक पातळीवर उच्चस्थानी नेऊ शकतात, असे प्रतिपादन छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे सचिव पद्माकर मुळे यांनी केले.

राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या वतीने छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक सभागृहात झालेल्या करिअर मार्गदर्शन मेळाव्यात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी तंत्रशिक्षण मंडळाचे सहाय्यक सचिव डॉ. बी एम मानकर यांनी तंत्रशिक्षणाविषयी मार्गदर्शन केले. तंत्र शिक्षणाचे विद्यमान सरकारने महत्व ओळखले आहे. आपला देश आता औद्योगिक प्रगतीविषयी भरारी घेणार आहे. सरकार मेक इन इंडिया सारखे कार्यक्रम राबवत आहे. भविष्यात या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार आहे. डीटीएचे एम एस रकटे यांनी तंत्रनिकेतन प्रवेश प्रक्रीयेविषयी, प्राचार्य उल्हास शिंदे यांनी करिअरच्या निवडीविषयी मार्गदर्शन केले. यावेळी डीटेक्ट इलेक्ट्रिकल सिस्टीमचे संचालक सतीश अजबे, छत्रपती शाहूचे डॉ. श्रीकांत देशमुख, दंत महाविद्यालयाचे डॉ. एस सी भोयर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. सुत्रसंचालन कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकचे प्राचार्य गणेश डोंगरे यांनी केले तर आभार प्रा. कैलास तिडके यांनी मानले.

## नितीन गडकरी यांच्याकडून अजित सीडस्च्या कपाशी वाणाची प्रशंसा



पुण्य नगरी
दिनांक १७.१२.२०१५



## अजित सीड्सच्या कपाशी वाणांची ॲग्रो व्हिजन प्रदर्शनात प्रशंसा

दै.सकाळ
दिनांक १८.१२.२०१५

## अजित सीड्सच्या वाणांची प्रशंसा



दै.दिव्य मराठी
दिनांक १८.१२.२०१५



विद्यार्थी परिषदेचे उद्घाटन करताना सौ. रजनीताई निलंगेकर पाटील, श्रीमती स्मृती ठाकर, प्रशासकीय अधिकारी डॉ श्रीकांत देशमुख, डॉ. राम ए काळे, डॉ जे ... वकील, डॉ सत्यजीत देशमुख, प्राचार्य डॉ अनुराधा शिंदे आदी मान्यवर



प्रोजेक्ट कॉम्पिटीशन मधील विजेत्यांसोबत सौ. रजनीताई निलंगेकर पाटील, श्रीमती स्मृती ठाकर, प्रशासकीय अधिकारी डॉ श्रीकांत देशमुख, डॉ. राम ए काळे, डॉ जे ... वकील, डॉ सत्यजीत देशमुख, प्राचार्य डॉ अनुराधा शिंदे, प्राचार्य ... , डॉ ... देशमुख आदी मान्यवर

# सांडपाण्यावर वीजनिर्मिती करा, सरकार पाठीशी

## ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची ग्वाही

विशेष प्रतिनिधी | औरंगाबाद

औरंगाबाद शहरातील सांडपाण्यावर ऊर्जानिर्मिती शक्य आहे. महापालिकेने ते करावे, राज्य सरकार पाठीशी आहे. त्यासाठी नागपूरजवळच्या कोराडीला भेट द्या अन् तसा चमत्कार तुमच्या शहरात घडवा, असे आवाहन ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महानगरपालिकेला केले. एलईडी लावून ८५ टक्के वीज बचत करणारे लाइट लावा, असा सल्लाही त्यांनी दिला.



वीज सवलत दिल्याबद्दल मंत्री बावनकुळे यांचा सत्कार करताना उद्योजक.

सीएमआयए व छत्रपती शाहू महाविद्यालयाच्या वतीने "लायटिंग अँड सोलार कॉन्क्लेव्ह"चे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी सांगितले की, एक कंपनी एलईडी मोफत द्यायला तयार आहे. केवळ वीज बिलाचे पैसे आम्हाला द्या, अशी कंपनीची मागणी आहे. मनपाने या कंपनीसोबत करार करावा, शासन मदत करेल. शेतकऱ्यांना ८ तास वीज मिळते त्यात वाढ १२ तास दिली जाईल. गावागावांत वीजपंपांना सौर ऊर्जा देणार असून महाराष्ट्रात ३ ते ४ वर्षांत छत्तीसगडपेक्षाही कमी दराने वीज देण्याची घोषणा त्यांनी केली.

## स्वस्त वीज

सरकार जीनिंग प्रेसिंग उद्योग, कापसावर आधारित उद्योगांना २.७० पैसे दराने वीज देणार आहे. अमरावतीत मोठे टेक्सटाइल पार्क होत आहे. तेथून ही सुरुवात करीत आहोत, असेही त्यांनी जाहीर केले.



# ‘मितवा’ची टीम आज शहरात

## विद्यार्थ्यांशी संवाद : सीएसएमएसएस व हायटेक महाविद्यालय

### सोनाली कुलकर्णी व स्वप्नील जोशीला भेटण्याची संधी



लोकमत युवा NXT



औरंगाबाद : लोकमत युवा नेक्स्टच्या सदस्यांना मराठी चित्रपट ‘मितवा’च्या टीमशी संवाद साधण्याची सुवर्णसंधी युवा नेक्स्टतर्फे उपलब्ध झाली आहे. ‘मितवा’ची टीम ही शहरातील कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था (सीएसएमएसएस) येथे शुक्रवारी दुपारी १२ वाजता भेट देणार आहे.

यावेळी युवा नेक्स्टच्या सदस्यांना मराठी चित्रपटसृष्टीतील चॉकलेटबॉय स्वप्नील जोशी व सोनाली कुलकर्णी यांच्यासह ‘मितवा’ चित्रपटाच्या टीमशी संवाद साधता येणार आहे. सीएसएमएसएस महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनंतर दि. ७ फेब्रुवारी रोजी हायटेक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी ही टीम संवाद साधणार आहे.

स्वप्ना वाघमारे- जोशी दिग्दर्शित या चित्रपटात स्वप्नील जोशी, सोनाली कुलकर्णी आणि प्रार्थना बेहेरे मुख्य भूमिकांत दिसतील. तसेच आघाडीच्या गायकांच्या आवाजात या चित्रपटातील गाणी चित्रित करण्यात आली आहे. या गायकांमध्ये स्वप्नील बांदोडकर, जान्हवी प्रभू अरोरा, बेला शेंडे, शंकर महादेवन आदींचा समावेश आहे. ‘मितवा’च्या या संपूर्ण टीमपैकी स्वप्नील जोशी व सोनाली कुलकर्णी, प्रार्थना बेहेरे, दिग्दर्शक स्वप्ना वाघमारे- जोशी आदींशी संवाद साधता येणार असल्याची माहिती युवा नेक्स्टतर्फे देण्यात आली.

युवा नेक्स्ट सदस्यांसाठी असे नवनवीन उपक्रम नेहमी राबवत असतो. तसेच अशा विविधरंगी कार्यक्रमांच्या माध्यमाने कलाकारांना भेटण्याची संधी उपलब्ध करुन देतो. सामाजिक, बौद्धिक तसेच शैक्षणिक उपक्रम घेऊन युवा पिढीच्या विकासाचा विचार युवा नेक्स्टच्या टीमतर्फे केला जातो.